वि.दि.दा.क्रं.०९/२०१७

गंगाधर वि. संभाजी

## <u>नि.क्रं.०१ खाली आदेश</u>

याकामी मा.उच्च न्यायालयाच्या रिट याचिका क्रं.२०६५/२०२३ मधील निर्देशाप्रमाणे वादीने आपला पुरावा दयावा म्हणून दि.१३/११/२०२५ रोजी वादीस तसे निर्देश नि.क्र.०१ खाली आदेश करुन देण्यात आले होते. मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे याप्रकरणी वादींना तारीख वाढवून मिळणार नाही असेही विशीष्टपणे त्यात नमूद केले होते. त्यानंतर दि.२८/११/२०२५ रोजी वादी क्रं. १ व प्र.वादी क्रं.४,९ हजर होते. वादीचे विधीज्ञ हजर होते. त्यादिवशी वादीतर्फे कोणताही पुरावा देण्यात आला नाही. आज वादी व त्यांचे वकील पुकारता सकाळच्या सत्रात ते गैरहजर आहेत. दुपारच्या सत्रात जर वादीने त्यास आदेशीत केल्यानुसार आपला पुरावा दिला नाही तर त्यांच्याविरुध्द आदेश होईल. कारण मा.उच्च न्यायालयाने सदर प्रकरण दि.०४/०२/२०२६ पर्यंत पुर्णत्वास देण्याबद्दल आदेशीत केलेले आहे. आज रोजी प्र.वादी क्रं. १ ते ५ तर्फे साक्षीदार राहुल संभाजी देपे हजर आहेत. प्र.वादी क्रं. ७ ते ९ तर्फे भागीरथी बालाजी देपे हजर आहेत. वादीनी आज दुपारच्या सत्रात आपल्या साक्षीदारांचा लेखी जबाब जर दिला तर तो स्वीकारण्यासाठी सदर पक्षकारांनी दुपारच्या सत्रात हजर रहावे.

स्वाक्षरीत/-

**[एस.एन.सरडे]**

**दिनांक: ११/१२/२०२५.** दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अहमदपूर.